IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** कडेगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0223 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/12/2023 22:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 8 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 12/12/2023
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/12/2023
**Time From (वेळेपासून):** 12:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/12/2023 **Time (वेळ):** 22:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/12/2023 22:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 00.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कडेगांव पोलीस ठाणे, तक्रारदार ,ता कडेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** आप्पासो दादासो पडळकर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड. )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कडेगांव, ,ताकडेगांव,कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कडेगांव, ,ताकडेगांव,कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभिजीत नारायण गोरड | | | 1. उपाळे, मायणी ,ता कडेगांव, कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि.12.12.2023

मी आप्पासो दादासो पडळकर,वय 33 वर्ष, धंदा- नोकरी- पोलीस उप निरीक्षक, कडेगांव पोलीस ठाणे. रा.मु.पो शिवणी, ता कडेगांव, जि. सांगली मो.नं 9420695191

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास असून मी माहे ऑगस्ट 2023 पासून कडेगांव पोलीस ठाणे येथे पोलीस उप निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे. कडेगांव पोलीस ठाणेस श्री. जितेंद्र शहाणे हे प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. कडेगांव पोलीस ठाणेस मी दुय्यम अधिकारी म्हणून काम पाहतो.

दि. 07.12.2023 रोजी 11.44 वा मला माझ्या मोबाईल वर 9307352933 या मोबाईल क्रमांकावरून फोन आला. समोरच्या व्यक्तीने "मी अभिजित गोरड बोलत असून तुम्ही पोलीस ठाणेस आहात का" असे विचारले असता मी पोलीस ठाणे येथे आहे असे सांगितले. त्यानंतर लगेच एक इसम माझ्या कक्षात आला व त्यांनी त्याचे नाव अभिजित गोरड असल्याचे सांगितले. सदर इसम हा कडेगांव पोलीस ठाणे गुरक्र 214/2023, भादवि सह कलम 323, 324, 504, 506 मधील आरोपी असल्याने मी त्यास ओळखतो. त्याचा भाऊ रणजित गोरड यांनी त्यांच्यावर भादवि कलम 324 प्रमाणे खोटा गुन्हा दाखल केला असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचा भाउ रणजित गोरड हा त्यांची, त्यांच्या आईवडीलांची व दुकानाची वॉट्सअॅप व्रर स्टेट्स ठेवून व फेसबुकद्वारे बदनामी करीत असल्याचा लेखी अर्ज त्यांनी दि. 07.12.2023 पोलीस ठाणेस दाखल केला असून तो पुढील चौकशीकरीता माझ्याकडे असल्याचे सांगितले. त्यानंतर त्याचा अर्ज बाहेर काढून मी पाहिला. त्यानतर त्यांच्या तक्रार अर्जावर योग्य ती चौकशी करून पुढील योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल असे मी त्यांना सांगितले. तरीही तो व्यक्ती माझे कोणतेही म्हणणे ऐकण्यास तयार नव्हता. नमुद तक्रार अर्जावर तात्काळ गुन्हा दाखला करा असा वारंवार दबाव टाकत होता. तसेच मला वारंवार फोन करीत होता. त्यांच्या तक्रारी अर्जावर योग्य ती कार्यवाही केली जाईल असे वारंवार सांगून देखिल तो इसम "माझ्या भावाला व चुलता पांडुरंग गोरड यांना कठोर कलम लावा, त्यांना अटक करा, त्यासाठी माझी दहा गुंठे जमीन विकावी लागली तरी चालेल पण त्यांना मी सोडणार नाही असे म्हणून तुम्हाला गुन्हा दाखल करण्यास किती रूपये लागतील, मी तुम्हाला 5,000 रुपये आणुन देतो, तुम्ही तात्काळ गुन्हा दाखल करा" असा दबाव टाकत होता. मी त्यास मी कायदेशीररित्या कारवाई करू असे सांगितले. त्यानंतर मी त्याला त्याचा जबाब देण्यास सांगितले असता त्याने नकार देवून "मी तुम्हाला उदया भेटायला येतो" असे सांगुन तो निघून गेला. त्याच दिवशी पुन्हा सायंकाळी 04.47 वा पुन्हा तो इसम नामे अभिजित गोरड याने मला माझ्या मोबाईवर फोन केला व तुम्हाला उदया परत भेटायला येतो माझे काम तेवढे करा असे बोलून त्याने फोन कट केला.

अभिजीत गोरड, रा.उपाळे मायणी हा इसम त्याने पोलीस ठाणेस दिले तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करणेसाठी मला 5,000/- रूपये लाच रक्कम देण्याचा प्रयत्न करीत असलेबाबत मी दि.08.12.2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना संपर्क करून माझी अभिजीत गोरड याचेविरूध्द लाच देत असलेबाबतची तक्रार असल्याचे सांगून मला पोलीस ठाणेस डयुटी नेमली असल्याने मी तक्रार देणेस सांगली येथे येवू शकत नसल्याचे सांगून आपण कडेगाव येथे येवून माझी तक्रार घेणेबाबत विनंती केली.

त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब यांनी मला पोलीस निरीक्षक भिलारे साहेब यांचेशी फोनव्दारे ओळख करून दिली. त्यावेळी पोलीस निरीक्षक भिलारे यांनी मला सायंकाळी कडेगाव येथे आलेनंतर संपर्क करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर सायंकाळी 18.00 वा चे सुमारास पोलीस निरीक्षक भिलारे यांनी मला संपर्क करून त्यांचेकडील वाहनांचे वर्णन सांगितले व ते कडेगाव ते कराड रोडवरील आशीर्वाद हॉटेल येथे आले असल्याचे सांगून मला त्याठिकाणी हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी काही वेळानंतर माझेकडील कारने अशीर्वाद हॉटेल येथे जावून पोलीस निरीक्षक भिलारे यांचे भेट घेतली. त्यावेळी पोलीस निरीक्षक भिलारे यांनी त्यांची व त्यांचे सोबत असले दोन पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर मी माझी वरीलप्रमाणे तक्रार पोलीस निरीक्षक भिलारे यांना पंचांसमक्ष सांगितली. भिलारे साहेब यांनी ब्युरोच्या कार्यप्रणाली बाबत माहिती देवून माझा तक्रारी अर्ज लेखी हजर करण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा लेखी तक्रारी अर्ज भिलारे साहेब यांचेसमक्ष हजर केला. सदर तक्रारी अर्जावर भिलारे साहेब व दोन्ही पंचांनी वाचून त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर श्री. अभिजीत गोरड यांचेविरुद्ध मी दिले लाच देत असलेच्या तक्रारीचे अनुषंगाने भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. दीपक तोडकर यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. सुधीर गोंधळी यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन श्री. अभिजीत गोरड यांची कडेगाव पोलीस ठाणे येथे जावून भेट घेणेबाबत सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 तोडकर असे माझेकडील टाटा पंच कार नं.एमएच-10-ईए-8028 मधून रवाना होवून कडेगाव पोलीस ठाणे येथे दाखल झालो. श्री. अभिजीत गोरड हे पोलीस ठाणेचे आवारात हजर होते. मी व पंच क्र 1 तोडकर यांच्यां सोबत पोलीस ठाणे मध्ये गेलो असता अभिजित गोरड हा आमच्या मागोमाग पोलीस ठाणेमध्ये आला. मी माझे कक्षामध्ये जावून बसलो, त्यावेळी पंच नं.1 हे देखील माझे कक्षामध्ये येवून बसले. त्यावेळी अभिजीत गोरड हा आमचे कक्षामध्ये आला. त्यावेळी अभिजीत गोरड याने मला "कराडला गेलो होतो... बर आता काय काय कस कस विषय करायचा मला सांगा....आता हयो विषय शंभर टक्के केलेला नाही हे खर आहे.....मारामारी हा प्रकार झालेला नाही पण लय रंगवलय...मला अडकवयचा मला संपवायचा हया दोघांचा प्लान आहे" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आता तुमचा अर्ज बघितला मी, अर्ज दिलाय तुम्ही स्टेटसचा, पण तुमच्या भावान स्टेटसमध्ये तुमचा कुठ उल्लेखच केला न्हाय नावाचा, पण आता कायदेशीर दृष्ट्या कुठला गुन्हा होत नाय" असे म्हणालो. त्यावर अभिजीत गोरड याने "सकाळी मी करतो, हित आलो काय नव्हत माझ्याजवळ, असुदे असुदे.......टेन्शन घेवू नका, पाच मी देतो सकाळी तुमच्याजवळ देतो, न्हायतर कोणाकड कसही करतो" असे म्हणून अभिजीत गोरड यांनी मला पुन्हा पुन्हा त्यांनी दिले तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करणेसाठी लाच देणार असलेबाबत सांगितले. त्यावर मी त्यांना "पगार भरपुर हाय शासनाचा.....तुमच तसल काय नको मला" असे म्हणाले. त्यानंतर मी अभिजीत गोरड यास पोलीस ठाणे येथे थांबणेबाबत सांगून मी व पंच नं.1 तोडकर असे माझेकडील कारने भिलारे साहेब थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला.

त्यानंतर भिलारे साहेबांनी पंच नं.1 तोडकर व मला पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये अभिजीत गोरड यांनी कडेगाव पोलीस ठाणेस गैरअर्जदार श्री.रणजित गोरड व.1 यांचेविरूध्द दिले तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करण्यासाठी लाच देत असलेबाबत आग्रह करीत असलेबाबत निष्पन्न झाले. परंतू अभिजीत गोरड हे नेमकी किती रक्कम देणार आहेत याची स्पष्टता नसल्याने भिलारे साहेब यांनी लाच रक्कम निश्चितीसाठी अभिजीत गोरड यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत पुन्हा माहिती देवून मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच श्री. अभिजीत गोरड यांची कडेगाव पोलीस ठाणे येथे जावून भेट घेणेबाबत सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 तोडकर असे माझेकडील टाटा पंच कार नं.एमएच-10-ईए-8028 मधून रवाना होवून कडेगाव पोलीस ठाणे येथे दाखल झालो. श्री. अभिजीत गोरड हे पोलीस ठाणेचे आवारात हजर होते. त्यावेळी मी व पंच नं.1 तोडकर असे पोलीस ठाणे आवारात जावून श्री. अभिजीत गोरड यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. अभिजीत गोरड यांनी "आत्ता माझ्याजवळ नाहीत, सकाळी करतो अॅडजस्ट कुणाजवळ म्हणाल त्याच्याजवळ हे करतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कोडयातलच बोलातय तुम्ही, स्पष्ट सांगा की" असे म्हणालो. त्यावर श्री. अभिजीत गोरड यांनी माझेशी चर्चा करून हाताने इशारा करून हाताची पाच बोटे दाखवून पाच हजार रुपये देत असल्याचा इशारा केला. व श्री. अभिजीत गोरड हे पोलीस ठाणे येथून निघून गेले. त्यानंतर मी व पंच नं.1 तोडकर असे माझेकडील कारने भिलारे साहेब थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला.

त्यानंतर भिलारे साहेबांनी पंच नं.1 तोडकर व मला पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेलें रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये अभिजीत गोरड यांनी कडेगाव पोलीस ठाणेस गैरअर्जदार श्री.रणजित

गोरड व.1 यांचेविरूध्द दिले तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करण्यासाठी 5,000/- रूपये लाच रक्कम देणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावेळी पोलीस निरीक्षक भिलारे यांनी मला अभिजीत गोरड यांचा निरोप आल्यानंतर त्यांना संपर्क करणेस सांगून पुढील सापळा कारवाई आयोजित करण्याच्या व गोपीनयता राखणेच्या सुचना दिल्या.
दि. 11.12.2023 रोजी रात्रौ 21.00 वा चे सुमारास श्री. अभिजीत गोरड यांनी मला संपर्क करून ते उद्ईक दि. 12.12.2023 रोजी सकाळी पोलीस ठाणे येथे भेटण्यास येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी भिलारे साहेब यांना संपर्क करून श्री. अभिजीत गोरड हा मला भेटण्यास पोलीस ठाणे येथे येणार असलेचे सांगितले. त्यावेळी भिलारे साहेब यांनी मला दि.12.12.2023 रोजी सकाळी कडेगाव येथे आलेनंतर संपर्क करीत असल्याच्या सुचना दिल्या.

आज रोजी भिलारे साहेब यांनी मला संपर्क करून कडेगाव ते कराड जाणारे रोडलगत असले हॉटेल आशीर्वाद जवळ हजर राहणेच्या सुचना दिल्या. काही वेळानंतर मी माझेकडील कारने भिलारे साहेब थांबले ठिकाणी जावून त्यांचेसमक्ष हजर झालो.

श्री. अभिजीत गोरड हे मला 5,000/- रूपये लाच रक्कम देण्यासाठी येणार असल्याने भिलारे साहेब यांनी कडेगाव पोलीस ठाणे येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. सुधीर गोंधळी यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. दिपक तोडकर यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत पुन्हा माहिती देवून मला व पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. भिलारे साहेब यांनी मला श्री.अभिजीत गोरड यांची कडेगाव पोलीस ठाणे येथे जावून भेट घेणेबाबत सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 गोंधळी असे माझेकडील टाटा पंच कार नं.एमएच-10-ईए-8028 मधून रवाना करीत असताना श्री. अभिजीत गोरड यांचा माझे मोबाईलवर फोन येत असलेने मी कॉल रिसीव्ह करून फोन लाऊड स्पिकरवर घेतला. त्यावेळी श्री. अभिजीत गोरड यांनी मला "हॅलो, साहेब आलोय मी" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "दोन मिनीटात येत असलेचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 गोंधळी असे माझेकडील वाहनाने व आमचे पाठोपाठ सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने रवाना झालो.

मी व पंच नं.1 गोंधळी असे कडेगाव पोलीस ठाणे येथे दाखल होवून माझी कार पोलीस ठाणे आवारात पार्क करून मी व पंच नं.1 असे पोलीस ठाणेमध्ये गेलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक असे पोलीस ठाणे आवारात सापळा लावून थांबून राहिले. त्यावेळी मी व पंच नं.1 गोंधळी असे माझे कक्षामध्ये गेलो असता श्री. अभिजीत गोरड हे माझे कक्षामध्ये हजर होते. त्यावेळी श्री. अभिजीत गोरड यांनी माझेशी चर्चा करून "हे ठेवा पाच, फोटो एक लागणार हाय ते देतो तुम्हाला, असुदे ठेवा पाच.....पुन्हा बघु, पुन्हा बघु असे म्हणून माझ्या समोर टेबलवर एक गोरड क्लॉथ सेंटर असे लिहिलेली पिशवी ठेवली. त्यावेळी मी अभिजीत गोरड यास "नको" असे म्हणालो. अभिजीत गोरड यांचे बोलण्यावरून सदर पिशवीमध्ये लाचेची रक्कम 5,000/- रूपये ठेवली असल्याची माझी खात्री झाल्याने मी माझे कक्षामधून बाहेर येवून लाच दिले बाबतचा हातरुमालाने तोंड पुसून पूर्व नियोजित इशारा केला. लागलीच भिलारे साहेब व सापळा पथक असे माझे जवळ आले व भिलारे साहेब यांनी माझेकडून डिझीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर भिलारे साहेब व सापळा पथक यांनी श्री.अभिजीत गोरड यांना माझे कक्षामध्ये पकडले. व त्यावेळी भिलारे साहेब यांनी त्यांची व सोबतचे पंच व सापळा पथकाची श्री.अभिजीत गोरड यांना ओळख करून दिली. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 यांनी सदर पिशवी तपासली असता पिशवी मध्ये 500/- रूपये दराच्या एकुण 10 नोटा असे 5,000/- रूपये व श्री.अभिजीत गोरड यांचे आधारकार्डची झेरॉक्स मिळून आले. भिलारे साहेब यांनी सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या पुर्ण करून पुढील सविस्तर सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह कडेगाव येथे पूर्ण केली.

तरी दि.08.12.2023 रोजीचे 19.26 वा ते 20.19 वा चे दरम्यान श्री. अभिजीत नारायण गोरड, वय- 36 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. उपाळे मायणी, ता.कडेगाव, जि.सांगली यांनी त्यांनी पोलीस ठाणेस गैरअर्जदार श्री. रणजित गोरड, वगैरे 1 यांचेविरूध्द दिले तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करून अयोग्यरित्या कर्तव्य पार पाडण्यासाठी मला 5,000/- रूपये लाच रक्कम देत असलेबाबत सांगून आज दि.12.12.2023 रोजीचे 12.43 ते 12.50 दरम्यान लाच रक्कम 5,000/- रूपये कडेगाव पोलीस ठाणे येथील माझे कक्षामध्ये माझे समोरील टेबलवर ठेवली. म्हणून माझी श्री.अभिजीत नारायण गोरड, वय- 36 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. उपाळे मायणी, ता. कडेगाव, जि.सांगली यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील वर्दी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंन्ट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचें.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासांचे काम हाती घेतले**):**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:** JITENDRA Prabhakar SHAHANE(I (Inspector)) / PNMAH69255 **or (**किंवा**)**

**Rank** (पद)**:** **No.**(क्र.)**:**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ)**:**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव)**:** JITENDRA Prabhakar
**Rank**(पद)**:** I (Inspector)
**No.**(सं.)**:** PNMAH69255



पोलीस स्टेशन ऑफीसर
कडेगांव पोलीस ठाणे